नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २५ Issue - 25 | वार बुधवार दि. ११ जून २०२५ Blow- Wednesday Date 11 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# सोलापूर, पुणे-ठाण्यासह ९ महापालिकांमध्ये प्रभाग रचनेचे आदेश

## महापालिका निवडणुकांबाबत मोठं पाऊल; मुंबईमध्ये मात्र एकसदस्यीय प्रभाग रचना



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठीच्या हालचालींना वेग आला असून त्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे. त्याच पार्श्वभूमीवर महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींना प्रभाग रचना करण्याचे आदेश राज्य सरकानं दिले आहेत. अ, ब आणि क वर्ग महानगरपालिकांची प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश सरकारने दिले आहेत. यामध्ये पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, पिंपरी चिंचवड, नवी मुंबई, वसई विरार, छत्रपती संभाजीनगर आणि कल्याण डोंबिवलीसारख्या महापालिकांचा समावेश आहे.

राज्यात गेल्या तीन ते चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. त्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर आता त्यासंबंधी हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. या निवडणुकीसाठी प्रभाग रचना करण्यासंदर्भात राज्य सरकारने आदेश दिले आहेत.

राज्यात ज्या ठिकाणी महापालिका निवडणुका घेण्यात येणार आहेत त्या ठिकाणी आता प्रभाग रचनेचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामध्ये प्रभागांची रचना कशी करायची आणि लोकसंख्येचे काय निकष लावायचे याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत.

महाराष्ट्रातील महापालिकांची प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश जारी करण्यात आल्यानंतर मुंबईमध्ये जुन्याच प्रभागानुसार निवडणुका होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. त्यानुसार मुंबई महानगरपालिकेमध्ये २२७ एकसदस्यीय प्रभाग रचना करण्यात येणार आहे. तर पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, नवीमुंबई, पिंपरी चिंचवड, छ. संभाजीनगर, यासह इतर सर्व महापालिकांमध्ये चार सदस्यांचे प्रभाग असणार आहेत.

मुंबईमध्ये आधी २२७ प्रभाग होते. महाविकास आघाडी सत्तेत आल्यानंतर त्यामध्ये वाढ होऊन २३६ प्रभाग करण्यात आले. पुन्हा महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर २२७ प्रभाग करण्यात आले. त्याला आव्हान सर्वोच्च न्यायालयात देण्यात आलं होतं. पण ती याचिका फेटाळण्यात आली. त्यामुळे मुंबईमध्ये २२७ प्रभाग असणार आहेत.

अ वर्ग महानगरपालिका - पुणे, नागपूर

ब वर्ग महानगरपालिका - ठाणे, नाशिक, पिंपरी-चिंचवड

क वर्ग महानगरपालिका - नवी मुंबई, वसई-विरार, छत्रपती संभाजीनगर, कल्याण डोंबिवली

ड वर्ग महापालिकांमध्ये तीन ते पाच सदस्य

ड वर्गातील महापालिकेत प्रभाग रचना ठरवताना शक्यतोवर सर्वच प्रभाग चार सदस्यांचे करायचे आहेत. मात्र, सर्वच प्रभाग चार सदस्यांचे होत नसल्यास एक प्रभाग तीन अथवा ५ सदस्यांचा होईल किंवा दोन प्रभाग ३ सदस्यांचे होतील. ड वर्ग महापालिकांमध्ये अमरावती, अहिल्यानगर, अकोला, कोल्हापूर, सोलापूर, संगाली-मिरज-कुपवाड, मिरा भाईंदर, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर, जळगाव, नांदेड, धुळे, मालेगाव, लातूर, चंद्रपूर, परभणी, पनवेल, इचलकरंजी आणि जालना या महापालिकेचा समावेश आहे.

# पाकिस्तानचा खरा चेहरा जगासमोर उघड करणाऱ्या शिष्टमंडळाची पंतप्रधानांनी घेतली भेट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पाकिस्तानला जगासमोर उघड करून परतलेल्या शिष्टमंडळातील नेत्यांची आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भेट घेतली.

ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरुद्ध भारताची ठाम भूमिका मांडण्यासाठी मंगळवारी संध्याकाळी जगभरातील राजधान्यांना भेट देणाऱ्या सर्वपक्षीय शिष्टमंडळाच्या सदस्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भेट दिली. सर्व सदस्यांनी पंतप्रधानांसोबत त्यांचे अनुभव शेअर केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा शिष्टमंडळातील सदस्यांसोबत जेवणाचा कार्यक्रमही आहे. केंद्र सरकारने ५० हून अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या सात शिष्टमंडळांच्या कामाचे कौतुक केले आहे. या शिष्टमंडळामध्ये बहुतेक विद्यमान खासदार होते. माजी खासदार आणि माजी राजनयिक देखील या शिष्टमंडळांचा भाग होते, ज्यांनी ३३ परदेशी राजधान्यांना आणि युरोपियन युनियनला भेट दिली.

भाजप खासदार रविशंकर प्रसाद आणि बैजयंत पांडा, काँग्रेसचे शशी थरूर, जेडीयूचे संजय झा, शिवसेनेचे श्रीकांत शिंदे, द्रमुकच्या कनिमोळी आणि राष्ट्रवादी (सपा) च्या सुप्रिया सुळे यांनी त्यांच्या संबंधित शिष्टमंडळांचे नेतृत्व जगाच्या विविध भागात केले. परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी आधीच शिष्टमंडळांना भेटले आहे आणि पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरुद्ध भारताची कडक भूमिका मांडण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले आहे. सत्ताधारी आघाडीच्या खासदारांनी चार शिष्टमंडळांचे नेतृत्व केले, ज्यात भाजपचे दोन, जेडीयूचा एक आणि शिवसेनेचा एक खासदार होता. तर तीन विरोधी खासदारांनी नेतृत्व केले, ज्यात काँग्रेस, द्रमुक आणि राष्ट्रवादी काँग्रेस (सपा) चा प्रत्येकी एक खासदार होता.

# सहलीला गेलेल्या ८ मित्रांचा नदीत बुडून मृत्यू



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जयपूर: राजस्थानच्या टोंक जिल्ह्यात मोठी दुर्घटना घडली आहे. बनास नदीवर तयार करण्यात आलेल्या फ्रेजर पुलाजवळ अंघोळ करता करता ८ तरुणांचा बुडून मृत्यू झाला. ११ तरुण नदीत अंघोळीसाठी गेले होते. यातील ८ जणांचा बुडून मृत्यू झाला. एकाएकी खोल पाण्यात गेल्यानं तरुण एकापाठोपाठ एक बुडू लागले. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली.

स्थानिकांच्या मदतीनं काही तरुणांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्यांच्यावर सध्या उपचार सुरु आहेत. रुग्णालयात मोठी गर्दी जमली आहे. कुटुंबीय, नातेवाईकांची अवस्था बिकट आहे. हाताशी आलेली मुलं अकाली गेल्यानं कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. पोलीस आणि प्रशासन घटनास्थळी पोहोचलं असून मदतकार्य सुरु आहे. मृत पावलेले सगळे तरुण जयपूरचे आहेत. बनास नदीत अंघोळीसाठी आलेले आणि पोहताना बुडून मरण पावलेले तरुण एकमेकांचे मित्र आहेत. पिकनिकसाठी ते टोंक जिल्ह्यात गेले होते. पाण्याच्या खोलीचा अंदाज चुकल्यानं ही दुर्घटना घडली. एक तरुण बुडू लागलाच त्याला वाचवण्यासाठी दुसरा सरसावला. तो बुडू लागताच तिसरा त्याच्या मदतीला गेला. अशाच प्रकारे एकापाठोपाठ आठ जण बुडाले. जयपूरहून ११ तरुण सहलीसाठी टोंकला आले होते. सगळे तरुण २० ते २५ वर्षे वयोगटातील आहेत, अशी माहिती टोंक जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक विकास सांगवान यांनी दिली. 'बनास नदीवर असलेल्या जुन्या पुलाजवळ ११ तरुण पाण्यात उतरले. तिथे ते अंघोळ करत होते. तेव्हा त्यांच्यातला एक जण बुडू लागला. त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात बाकीचे तरुण बुडू लागले,' असं सांगवान यांनी सांगितलं. 'स्थानिकांनी कसंबसं तीन तरुणांना वाचवलं. पण ८ जणांचा जीव वाचू शकला नाही. या दुर्घटनेनंतर सआदत रुग्णालयात प्रचंड गर्दी जमली. पोलीस आणि प्रशासकीय अधिकारी घटनास्थळी पोहोचले. स्थानिक प्रशासनानं दुर्घटनेच्या तपासाचे आदेश दिलेले आहेत,' अशी माहिती सांगवान यांनी दिली.




## बीएस्सी नर्सिंगच्या विद्यावेतनातही मोठी वाढ; मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय

# भौतिकोपचार व व्यवसायोचार पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यावेतनात भरघोस वाढ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील भौतिकोपचार (फिजिओथेरपी) आणि व्यवसायोपचार (क्युपेशनल थेरपी) पदव्युत्तर पदवी तसेच बी.एस्सी नर्सिंगच्या विद्यार्थ्यांच्या आंतरवासिता कालावधीतील विद्यावेतनात भरघोस वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

राज्यातील शासकीय भौतिकोपचार (इझढ), व्यवसायोपचार (इजढ) पदवी अभ्याक्रमाच्या विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर २६ आठवड्यांचे आंतरवासिका (इंटरनशिप) प्रशिक्षण पूर्ण करणे गरजेचे असते. तसेच या भौतिकोपचार व व्यवसायोपचार पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी इतर विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांप्रमाणे रुग्णालयातील बाह्य रुग्ण विभाग आणि अंतररुग्ण विभागात सेवा देतात. तसेच बी. एस्सी नर्सिंग पदवी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी आणि भौतिकोपचार (चझढ) आणि व्यवसायोपचार (चजढ) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी इंटरनशिप कालावधीत रुग्णालयामध्ये अपघात विभाग, रेडिऑलॉजी, ओपीडी, प्रयोगशाळा,कार्डिओलॉजी, न्यूरोलॉजी विभागात सेवा देत असतात.

राज्यातील शासकीय भौतिकोपचार (फिजिओथेरपी) आणि व्यवसायोपचार (ओक्युपेशनल थेरपी) पदव्युतर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना आंतराविसाता कालावधीत मिळणाऱ्या विद्यावेतनात वाढ करण्याची गरज निर्माण झाली होती. गेल्या २३ वर्षांपासून या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्यात आलेली नव्हती. भौतिकोपचार (फिजिओथेरपी) आणि व्यवसायोपचार (ओक्युपेशनल थेरपी) यांच्या विद्यावेतनात १ जून २०२५ रोजी पासून १० हजार रुपये इतकी वाढ करण्यात आली आहे. मूळ वेतन व महागाई भत्ता व झालेली वाढ मिळून आता हे विद्यावेतन दर महा ३३ हजार ७३० रुपये इतके असेल. यासाठीच्या ६७ लाख २० हजार रुपयांच्या आर्थिक तरतुदीसही मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे राज्यातील भौतिकोपचार (फिजिओथेरपी) आणि व्यवसायोपचार (ओक्युपेशनल थेरपी) पदव्युत्तर पदवी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

तसेच बी एस्सी नर्सिंगच्या पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना १ जून २०२५ रोजी पासून ८ हजार रुपये विद्यावेतन देण्याचा निर्णय ही घेण्यात आला आहे. यासाठीच्या १ कोटी २० लभ रुपयांच्या आर्थिक तरतुदीसही मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील वाढती रुग्ण संख्या लक्षात घेता एमपीटी, एमओटी आणि बी एस्सी नर्सिंगच्या विद्यार्थ्यांची संख्या वाढणे व त्यांची सेवा जास्तीत जास्त उपलब्ध करुन घेण्याची गरज असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

## संपादकीय....

### प्रभाग रचना

राज्यात गेल्या तीन ते चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. त्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर आता त्यासंबंधी हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. या निवडणुकीसाठी प्रभाग रचना करण्यासंदर्भात राज्य सरकारने आदेश दिले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठीच्या हालचालींना वेग आला असून त्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे. त्याच पार्श्वभूमीवर महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींना प्रभाग रचना करण्याचे आदेश राज्य सरकानं दिले आहेत. अ, ब आणि क वर्ग महानगरपालिकांची प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश सरकारने दिले आहेत. यामध्ये पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, पिंपरी चिंचवड, नवी मुंबई, वसई विरार, छत्रपती संभाजीनगर आणि कल्याण डोंबिवलीसारख्या महापालिकांचा समावेश आहे. राज्यात ज्या ठिकाणी महापालिका निवडणुका घेण्यात येणार आहेत त्या ठिकाणी आता प्रभाग रचनेचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामध्ये प्रभागांची रचना कशी करायची आणि लोकसंख्येचे काय निकष लावायचे याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. महाराष्ट्रातील महापालिकांची प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश जारी करण्यात आल्यानंतर मुंबईमध्ये जुन्याच प्रभागानुसार निवडणुका होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. त्यानुसार मुंबई महानगरपालिकेमध्ये २२७ एकसदस्यीय प्रभाग रचना करण्यात येणार आहे. तर पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, नवीमुंबई, पिंपरी चिंचवड, छ. संभाजीनगर, यासह इतर सर्व महापालिकांमध्ये चार सदस्यांचे प्रभाग असणार आहेत. मुंबईमध्ये आधी २२७ प्रभाग होते. महाविकास आघाडी सत्तेत आल्यानंतर त्यामध्ये वाढ होऊन २३६ प्रभाग करण्यात आले. पुन्हा महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर २२७ प्रभाग करण्यात आले. त्याला आव्हान सर्वोच्च न्यायालयात देण्यात आलं होतं. पण ती याचिका फेटाळण्यात आली. त्यामुळे मुंबईमध्ये २२७ प्रभाग असणार आहेत. ड वर्गातील महापालिकेत प्रभाग रचना ठरवताना शक्यतोवर सर्वच प्रभाग चार सदस्यांचे करायचे आहेत. मात्र, सर्वच प्रभाग चार सदस्यांचे होत नसल्यास एक प्रभाग तीन अथवा ५ सदस्यांचा होईल किंवा दोन प्रभाग ३ सदस्यांचे होतील. ड वर्ग महापालिकांमध्ये अमरावती, अहिल्यानगर, अकोला, कोल्हापूर, सोलापूर, संगाली-मिरज-कुपवाड, मिरा भाईंदर, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर, जळगाव, नांदेड, धुळे, मालेगाव, लातूर, चंद्रपूर, परभणी, पनवेल, इचलकरंजी आणि जालना या महापालिकेचा समावेश आहे.

# एमएमबीच्या कर्मचाऱ्यांना मुळवेतन आणि महागाई भत्त्यानुसार अंशदान देण्यास मंजुरी

## बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली एमएमबीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र सागरी मंडळाच्या कर्मचाऱ्यांना त्यांचे मूळ वेतन व महागाई भत्त्यानुसार भविष्य निर्वाह निधी योजनेचे अंशदान १२ टक्के इतके देण्यास आजच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. याचा फायदा मंडळाच्या कर्मचाऱ्यांना होणार आहे. महाराष्ट्र सागरी मंडळाची ८३ वी बैठक बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात संपन्न झाली. यावेळी हा प्रस्तावास मंजुरी देण्यात आली.

बैठकीस एमएमबीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. प्रदीप, प्रशासकीय अधिकारी प्रदीप बढीये यांच्यासह वित्त, गृह, बंदरे, नौदल, तट रक्षक दल यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

महाराष्ट्र सागरी मंडळाच्या कर्मचाऱ्यांना या पूर्वी १५ हजार रुपये वेतनाप्रमाणे १० टक्के इतकी अंशदान कपात दिली जात होती. त्यामुळे निवृत्ती वेतनामध्ये त्यांना फारसा लाभ मिळत नव्हता. ही बाब लक्षात घेऊन त्यांना मूळ वेतन व महागाई भत्ता यांच्या एकत्रित रकमेवर १२ टक्के अंशदान भरण्यास मंजुरी देण्यात आली. यामुळे कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतानामध्ये भरीव वाढ होणार आहे. या मंजुरीनुसार आता कर्मचाऱ्यांचे १२ टक्के आणि मंडळाचे १२ टक्के असे एकूण २४ टक्के अंशदान कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी योजनेमध्ये जमा करण्यात येणार आहेत.

या बैठकीमध्ये वाढवन बंदराचा मंडळाचा हिस्सा समभाग स्वरुपात जमा करण्यासही मान्यता देण्यात आली. तसेच रेवदंडा येथील लोटरोधक भिंत, रो रो जेटी बांधकामाच्या निविदा प्रक्रिया राबवण्यास, रेवदंडा, थेरोंडा येथील कॅप्टीव प्रवासी टर्मिनल प्रस्तावाच्या इरादापत्रास मुदतवाढ आणि खलासी कर्मचाऱ्याच्या पत्नीच्या वैद्यकीय प्रतिपुर्ती खर्चास आणि बोरीवली येथील रो रो जेटीच्या ५२ कोटी रुपयांच्या कामास कार्यारंभ आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.

# सदाशिव माळगे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील आळगे गावचे सुपुत्र आणि सध्या पुण्यातील नामांकित शिक्षण संस्थेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेले सदाशिव माळगे सर यांना त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याची दखल घेत राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

मुंबई येथील जॉय सामाजिक संस्था आयोजित १० व्या वर्धापन दिनानिमित्त जोगेश्वरी येथील अस्मिता भवन सभागृहात पार पडलेल्या भव्य सोहळ्यात हा पुरस्कार माळगे सरांना प्रदान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणारे, गरजू विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे, अडचणीच्या वेळी विद्यार्थ्यांसोबत खंबीरपणे उभे राहणारे शिक्षक म्हणून माळगे सरांची एक खास ओळख निर्माण झाली आहे.

या कार्यक्रमात शैक्षणिक, सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या विविध मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. सदाशिव माळगे सरांना सन्मानचिन्ह, शाल, प्रमाणपत्र आणि जॉय ऑफ गिव्हिंग चे मेडल प्रदान करून गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जोगेश्वरी भूषण डॉ. एम. डी. वळंजू यांनी भूषवले. प्रमुख अतिथी म्हणून कामगार नेते अविनाश दौंड, उच्च न्यायालयाचे वकील जगदीश जायले, समुपदेशक ॲड. रूषीला रिबेलो, ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र घरत, कुर्ला भूषण सत्येंद्र सामंत, डॉ. महेश अभ्यंकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात द्वीपप्रज्वलनाने झाली. योगिता हिरवे यांच्या स्वागतगीताने वातावरण भारावून गेले, तर भूषण मुळे यांच्या शिवगर्जनेने ऊर्जा भरली. प्रास्ताविक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गणेश हिरवे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन वैभव पाटील (नवी मुंबई समन्वयक) आणि कार्यध्यक्ष असूंता डिसोझा यांनी केले.

या राज्यस्तरीय गौरवाने सदाशिव माळगे सरांच्या शैक्षणिक कार्याची पावती मिळाली असून, त्यांच्या कार्याची दखल घेत सन्मानित केल्या बद्दल विद्यार्थीप्रिय, निस्वार्थ, आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून माळगे सर पुढील वाटचालीत यशश्री प्राप्त करोत, अशा शुभेच्छा त्यांना सर्व स्तरातून मिळत आहेत.

# पशुवैद्यकीय दवाखाना टाकळी श्रेणी-२ ता. शिरोळ मार्फत वृक्षारोपण व संकरित वासरांचा मेळावा उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळवाडी/प्रतिनिधी

टाकळी तालुका शिरोळ येथील दवाखाना परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला.तसेच कार्यक्षेत्रातील टाकळीवाडी या गावी संकरित वासरांचा मेळावा घेऊन जनावरांचे जंत व गोचीड निमूलन शिबीर घेण्यात आले. सदर शिबिरामध्ये ७६ जनावरांना जंतनाशक औषधे पाजण्यात आले.सदर शिबिरामध्ये क्षार खनिज मिश्रण पावडर, जीवन सत्व पावडर, चाटन विटा व गोचिड निर्मूलनाचे औषध वाटप करण्यात आले असून सदर शिबिरामध्ये उपस्थित पशु पालकांना पशु आहाराचे खाध्यातील महत्व पटवुन सांगितले तसेच जनावरांना विम्याचे व कानातील बिल्यांचे महत्व पटवुन सांगितले सदर शिबिरास मा. हरिश्चंद्र पाटील,विजय पाटील, तात्यासो शिरहट्टी आदी मान्यवर तसेच डॉ. पल्लवी कुरुंदकर डॉ. झेंडे व पशुसंवर्धन विभागाच्या स्टाफ चे अनमोल सहकार्य लाभले डॉ.निर्मळे व्ही. एस. यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# धनगर समाजाच्या शिष्टमंडळाने घेतली पालकमंत्र्यांची भेट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आज मुंबई मंत्रालय येथे महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री व सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना. श्री.जयकुमार गोरे (भाऊ) यांची पंढरपूर येथील धनगर समाजाचे शिष्टमंडळाने भेट घेतली व पंढरपूर शहरातील नव्याने मंजूर झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक भवनांच्या भुमीपुजन कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून वंचित शोषित पिडीत बहुजनांचे कैवारी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना निमंत्रित करण्यात यावे असे निवेदन देण्यात आले.

यंदा आषाढी एकादशी निमित्त महापुजेसाठी दि.५जुले रोजी मुख्यमंत्री देवेंद्रजी येत आहेत व एकादशी दिवशी पण फडणवीस यांचा दौरा असणार आहे गेले अनेक वर्षे पंढरपूर शहरात अहिल्यादेवी होळकरांच्या नावाने सांस्कृतिक भवन व्हावे ही मागणी होती महायुतीच्या सरकार ने या भवनाला जागा उपलब्ध करुन तिन कोटी रुपये निधी मंजूर केला आहे या कामाचे टेंडर प्रक्रिया पूर्ण झाली असून हे भवन व्हावे म्हणून माऊली हळणवर यांचे नेतृत्व खाली समाज बांधवांनी आंदोलन केले होते व पाठपुरावा ही केला होता मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे शुभहस्ते व पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे उपस्थित राहून अहिल्या देवी होळकरांच्या त्रिशताब्दी वर्षांमध्ये सन्मान करावा अशी विनंती शिष्टमंडळाने केली यामध्ये माऊली भाऊ हळणवर ,पंकज देवकते ,प्रशांत घोडके लिगंराज शेंडगे,अक्षय बोरकर उपस्थित होते यावेळी मंत्री महोदयांनी नक्कीच मुख्यमंत्री महोदयांना वेळ देण्याची विनंती करतो असे आश्वासन दिले....

**सामाजिक न्याय विभागाचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा संपन्न**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन**

# ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील कुटुंबांना घरे देणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : केंद्र व राज्य शासनामार्फत अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील नागरिकांचे जीवन सुसह्य करण्यासाठी विविध राबविल्या जातात. या प्रवर्गातील नागरिकांना गृहनिर्माणच्या विविध योजनांच्या माध्यमातून हक्काचे घर दिले जाते. केंद्र शासनाने या वर्षी ३० लाख घरे राज्याला उपलब्ध करून दिली आहेत. त्यामुळे कोणीही व्यक्ती बेघर राहणार नाही. ग्रामीण भागात अनुसूचित जाती व जमाती मधील नोंदीत असलेल्या प्रत्येक कुटुंबाला यावर्षी प्राधान्याने घर देण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने सन २०२३-२४ आयोजित पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे झाला त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, मृद व जलसंधारण संजय राठोड, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, आमदार संतोष बांगर आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेले भारतीय संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधान आहे. त्यात मानवता, समता, बंधुता आणि संधीची समानता आहे. भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून 'घरोघरी संविधान' हा उपक्रम राज्यात राबवण्यात येत असून त्यातून उद्देशिका प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवली जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, महापुरुषांचे विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचे कार्य शासन सातत्याने करत आहे. जे समाजाच्या भल्यासाठी निस्वार्थ भावनेने कार्य करतात, अशा व्यक्तींच्या पाठीशी शासन कायम उभे आहे. राज्यात अनुसूचित जाती व जमातींसाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, त्यामध्ये शिष्यवृत्ती योजना, आश्रमशाळा, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, परदेशी शिक्षणासाठी साहाय्य, तसेच महामंडळांच्या माध्यमातून रोजगाराभिमुख योजना राबविल्या जात आहेत. प्रधानमंत्री आवास योजना, पीएम किसान योजना, पीएम फसल बीमा योजना, मुद्रा योजना आणि स्टँड अप इंडिया योजनेत अनुसूचित जाती-जमातीतील घटकांना लाभ मिळाला आहे. केंद्र शासनाच्या धोरणांमुळे लाखो तरुण उद्योजक घडत असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील भव्य स्मारक अंतिम टप्प्यात असून लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, क्रांतिगुरु लहूजी वस्ताद साळवे यांची स्मारके उभारण्याची कामेही वेगाने सुरु असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. सामाजिक न्याय विभागाचा निधी त्याच विभागाच्या उद्दिष्टपूर्तीसाठीच वापरण्यात येत आहे, असे स्पष्ट करत त्यांनी समाजहितासाठी कार्य करणाऱ्या पुरस्कार प्राप्त व्यक्ती आणि संस्था यांचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी अभिनंदन केले.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, या पुरस्कार सोहळ्याच्या माध्यमातून समाजकार्य करणाऱ्यांचे कौतुक होते, तसेच महामानवांचे स्मरणही होते. चांगल्या कार्याचा गौरव झाल्यास समाजात सकारात्मक प्रेरणा मिळते. यापुढे हा पुरस्कार सोहळा दरवर्षी घेतला जाईल. राजर्षी शाहू महाराज यांनी सर्व जातींच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू केली. महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाचा पाया घातला. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य केले. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला वैचारिक गुलामगिरीतून बाहेर काढल, संत रविदास महाराज यांनी समाजातील गरीब, शोषित, वंचित लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी आवाज उठवला. या महामानवांच्या कार्याचा आदर्श ठेवूनच समाजातील बांधवांनी कार्य करावे. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक प्रगत राज्य असून, परकीय गुंतवणुकीत राज्य पहिल्या क्रमांकावर आहे. उपमुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले, महाराष्ट्र हे दिव्यांग कल्याण विभाग स्थापन करणारे देशातील पहिले राज्य असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

मंत्री श्री. शिरसाट म्हणाले, आपल्याला मिळालेला पुरस्कार हा आपण केलेल्या कार्याचा गौरव आहे. या पुरस्कारांसाठी राज्यभरातून ८०० हून अधिक अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १३० जणांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये ९० व्यक्ती व ४० संस्थांचा समावेश आहे. विभागाच्या महत्त्वाच्या सेवांचा लाभ थेट व्हॉट्सपद्वारे घेता येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

सन २०२३-२४ या वर्षासाठीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार, कर्मवीर पद्मश्री दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, शाहु, फुले, आंबेडकर पारितोषिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार या पुरस्कारांचे वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे यांनी केले. तर आभार समाज कल्याण प्रभारी आयुक्त प्रवीण पुरी यांनी मानले.

पुरस्कार प्राप्त व्यक्ती व संस्थांची संख्या आणि पुरस्काराचे स्वरुप :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार ६१ व्यक्तीं - (प्रत्येकी ७५ हजार), व १० संस्था (प्रती संस्था प्रत्येकी १ लाख), साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार २७ व्यक्ती (प्रत्येकी ७५ हजार ) व ६ संस्था ( प्रती संस्था प्रत्येकी १ लाख), कर्मवीर पद्मश्री दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार १ व्यक्तीं -(प्रत्येकी ५१ हजार ), व १ संस्था (प्रती संस्था प्रत्येकी १ लाख). संत रविदास पुरस्कार १ व्यक्तीं - (प्रत्येकी ५१ हजार), व १ संस्था (प्रती संस्था प्रत्येकी १ लाख). शाहु, फुले, आंबेडकर पारितोषिक एकूण १४ संस्थेला ६ महसुली विभागानूसार प्रत्येकी दोन संस्था ७.५० लाख सन्मानपत्र, मानपत्रासाठी चांदीचा स्क्रोल, स्मृतीचिन्ह, शाल, व श्रीफळ. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्रावीण्य पुरस्कार ८ संस्था, राज्यस्तर ३ पुरस्कार प्रथम पुरस्कार ५ लाख, द्वितीय पुरस्कार ३ लाख व तृतीय पुरस्कार २ लाख, विभागीय स्तरावर पुरस्कार संख्या ५, प्रत्येकी १ लाख याप्रमाणे राज्यातील ९० व्यक्ती व ४० संस्थांचा एकूण १३० पुरस्कारार्थ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आषाढी यात्रा: होडी चालक, मालकांनी १५ जून पर्यंत होड्यांची नोंदणी करावी : जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद

## आसनक्षमतेपेक्षा जास्त जलप्रवासी वाहतुक करु नये, सुर्यास्तानंतर जलप्रवास वाहतुक बंद ठेवावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी शुध्द एकादशी दि.०६ जुलै २०२५ रोजी असून, यात्रा कालवधी २६ जून ते १० जुलै असा आहे. या यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. वारकऱ्यांसाठी चंद्रभागा स्नान फार मानले जाते. चंद्रभागा स्नानासाठी नदी पात्रात मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होते. तसेच येणारे भाविक चंद्रभागा नदीत नौका विहार करतात. या कालावधीत कोणतीही अनुचित घडना घडू नये तसेच भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व होडी मालकांनी व चालकांनी होड्याची नोंदणी करावी असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिले.




आषाढी यात्रेच्या अनुषंगाने श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्त निवास पंढरपूर येथे होडी मालक व चालक यांची बैठक आयोजीत करण्यात आली होती. बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, प्रांताधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, भीमा पाटबंदारे कार्यकारी अभियंता एस.के. हरसुरे, तहसिलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे,उप कार्यकारी अभियंता ज्योती इंगोले, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले तसेच होडी मालक व चालक उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद म्हणाले, चंद्रभागा नदी पात्रात होडी मालकांनी व चालकांनी होड्याची नोंदणी करणे आवश्यक असून, ज्यांनी नोंदणी केली नाही त्या होडी मालकांना व चालकांना चंद्रभागा नदी पात्रात जलप्रवास वाहतुकीसाठी परवनगी दिली जाणार नाही. होड्यांना मिळालेला नोंदणी क्रमांक ठळक अक्षरात लावावा. वारी कालावधी अगोदर आपल्या होडींची दुरुस्ती करुन घ्यावी व वेळोवेळी देखभाल करावी. आपली होडी प्रवासी वाहतुक करण्यासाठी योग्य असल्याची खात्री करुन त्याबाबतचे हमीपत्र द्यावे. योग्य आसन क्षमता प्रवासी व चालक, मालकसहित निश्चित करावी. जलप्रवासी वाहतुकीचे वेळापत्रक निश्चित करावे, सुर्यास्तानंतर जल प्रवासी वाहतुक करु नये. होडीत लाईफ जॅकेटची उपलब्धता ठेवावी. नगर पालिका प्रशासनाने मुबलक प्रमाणात लाईफ जॅकेटची उपलब्धता करुन द्यावी. पाटबंधारे विभागाने भाविकांसाठी होड्यांना जलप्रवासी वाहतुकीची चढण्याची व उतरण्याची ठिकाणे निश्चित करुन द्यावीत. त्या ठिकाणी पाटबंधारे, पोलीस व नगरपालिका विभागाच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. जेणेकरुन प्रवासी संख्या देखील आसन क्षमतेनुसार राहिल असेही जिल्हाधिकारी श्री आशिर्वाद यांनी यावेळी सांगितले.

तसेच वारी कालावधीत चंद्रभागा नदीपात्रात साधारणत: ६ ते ८ हजार क्युसेक इतका विसर्ग आल्यास जलप्रवासी वाहतुक पुर्णपणे बंद ठेवावी. प्रशासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करावे. त्याचबरोबर पूर परस्थिती निर्माण झाल्यास भाविकांना नदी पात्रात जाण्यापासून परावृत्त करावे. यापूर्वीही चंद्रभागा नदी पात्रात भाविकांच्या सूरक्षेबाबत होडी चालक, मालकांचे प्रशासनास चांगले सहकार्य लाभले असल्याचेही जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी यावेळी सांगितले.

## पंढरपुरात वटपौर्णिमेनिमित्त श्री रूक्मिणीमातेस अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : ज्येष्ठ शु. १४ वटपौर्णिमे निमित्त श्री रूक्मिणी मातेस पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी अलंकाराचा समावेश असल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.



## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उगाव येथे वृक्षारोपण व रोपे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील उगाव येथे जागतिक पर्यावरण दिना चे औचित्य साधून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या व सेवा भारती पश्चिम महाराष्ट्र प्रांत, नाशिक तसेच उगाव येथील स्वयंसेवक नितीन पानगव्हाणे, यांच्या पुढाकाराने उगाव शहरात प्रत्येक कुटुंबासाठी दोन झाडे याप्रमाणे एकूण ८०० झाडांच्या रोपांचे वाटप करून लागवड करण्यात आली.

जे कुटुंब लावलेल्या झाडांचे तीन वर्षांसाठी संवर्धन व संरक्षण करण्याचे हमी देतील अशाच कुटुंबांना रोपांचे वितरण करण्यात आले.

उगाव येथील श्रीराम मंदिरात सदर कार्यक्रम संपन्न झाला. त्याप्रसंगी उंगाव-खेडे येथील संत विष्णू महाराज जेऊघाले यांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेचे पुजन व वृक्ष रोपांचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून निफाड येथील साई मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल चे संचालक डॉ. रोहित धोक्रट होते. त्यांनी पर्यावरण संवर्धन, तसेच पर्यावरणाचे महत्त्व, मानवी

**डॉ. रोहित धोक्रट यांचे मार्गदर्शन**

आरोग्यासाठी कोरोणा काळातील उपयोगी पडलेल्या वृक्षांचे महत्व .. कोरोना काळातील रुग्णांच्या आरोग्यासाठी वृक्षांचे योगदान याविषयी वैज्ञानिक माहिती उपस्थितांना देवून प्रत्येकाने एक तरी झाड लावून त्याचे संवर्धन केले पाहिजे. झाडे लावा, झाडे जगवा हा संदेश उपस्थितांना दिला.राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ग्रामविकास विभागाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत प्रमुख योगेश भारद्वाज यांनी वातावरणात निसर्गातील मानवाची ढवळाढवळ निसर्गातील सर्व जीवसृष्टीला वाचविण्यासाठीचे निसर्गाचे योगदान शेतीतील वृक्षांचे महत्त्व याविषयी उपस्थितांना माहिती दिली .याप्रसंगी




गावातील ज्येष्ठ नागरिक, बाल स्वयंसेवक ,तरुण स्वयंसेवक व सहपत्नीक उगाव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते . सदर वृक्षांची लागवड ही उगाव शहर आणि परिसरातील शेतावरील बांध, रस्त्याच्या कडेला, नदीकाठच्या परिसरात लागवड करण्यात आली. याप्रसंगी वनविभागाचे अधिकारी ग्रामविकास अधिकारी उपस्थित होते.

## प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेच्या माध्यमातून महिलांनी कृषी प्रक्रिया उद्योजक व्हावे : प्रा दिनेश क्षिरसागर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिनांक ०९ जून, २०२५ रोजी विकसित कृषी संकल्प अभियान अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र मोहोळ द्वारे शिंदेवाडी तालुका माढा येथे शेतकरी शास्त्रज्ञ संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आधुनिक कृषि तंत्रज्ञान आणि खरीप हंगाम नियोजन प्रसारासाठी विकसित कृषी संकल्प अभियान दि. २९ मे ते १२ जून २०२५ या दरम्यान सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये पोहोचवण्याचे काम महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र मोहोळ, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन आणि राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र सोलापूर, राष्ट्रीय भरड धान्य संशोधन संस्था, सोलापूर यांच्यामार्फत केले जात आहे.




आज माढा तालुक्यातील शिंदेवाडी येथे सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विषयाचे विषय विशेषज्ञ श्री. दिनेश क्षिरसागर यांनी कृषि मालाचे मूल्यवर्धन, ज्वारी व भरड धान्य प्रक्रिया, मसाले प्रक्रिया, दुग्ध प्रक्रिया, पापड उद्योग, कडधान्य प्रक्रिया आणि प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना, महिला बचत गट सदस्यांसाठी बीज भांडवल सुविधा आणि अन्न प्रक्रिया लघु उद्योगाची सुवर्णसंधी याविषयी सविस्तर माहिती दिली. डॉ. परशुराम पात्रोटी, वरिष्ठ शास्त्रज्ञ, केंद्रीय भरड धान्य संशोधन संस्था, सोलापूर यांनी भरड धान्याचे पौष्टिक तत्त्वे, विकसित वाण, बियाण्यांची उपलब्धता, लागवड तंत्रज्ञान आणि उद्योजकतेचे विकास याविषयी सविस्तर माहिती दिली. डॉ. शिल्पा परशुराम यांनी राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर च्या शिफारशी बाबत सविस्तर माहिती दिली. पीक संरक्षण विषयाचे विषय विशेषज्ञ डॉ. पंकज मडावी यांनी खरीप हंगामातील कीड व रोग व्यवस्थापन तंत्रज्ञानाबद्दल शेतकऱ्यांमध्ये जन जागृती केली. माती व पाणी परीक्षण आधारित खत व्यवस्थापन याबद्दल उपस्थित शेतकऱ्यांना मृद विज्ञान व कृषि रसायन शास्त्र विषयाचे विषय विशेषज्ञ श्रीमती काजल जाधव म्हात्रे यांनी माहिती दिली. याप्रसंगी शिंदेवाडी च्या सरपंच सौ मंदाकिनी शिंदे , मंडळ कृषि अधिकारी श्रीमती गायत्री चव्हाण, उप कृषि अधिकारी दादा पवार, सहायक कृषि अधीकारी श्री. राजशेखर कांबळे हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री सुयोग ठाकरे, कृषि मित्र, महिला स्वयं सहायता गटाचे सदस्य आदींचे सहकार्य लाभले.

## आषाढी यात्रेत ए आय तंत्रज्ञांच्या माध्यमातून भाविकांची संख्या मोजून गुन्हेगारीवर नियंत्रण; अतुल कुलकर्णी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :आषाढी यात्रेमध्ये विठ्ठलाच्या दर्शनासाठी दहा ते पंधरा लाख अधिक भाविक दाखल होत असतात त्यामुळे गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी गुन्हेगारावर करडी नजर ठेवण्यासाठी ए आय तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा येणार असल्याची माहिती सोलापूर जिल्हा पोलीस प्रमुख अतुल कुलकर्णी यांनी दिली

आषाढी यात्रेत या पार्श्व भूमीवर पंढरपुरात सोलापूर जिल्हा पोलीस प्रमुख अतुल कुलकर्णी यांनी बैठक घेतली या बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अर्जुन भोसले, पंढरपूर पंढरपूर शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, हो पंढरपूर तालुका वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री हुंबे आधी जण उपस्थित होते.



पत्रकारांशी संवाद साधताना जिल्हा पोलीस प्रमुख अतुल कुलकर्णी म्हणाले की आषाढी वारीत विठ्ठल दर्शनासाठी दहा लाखाहून जास्त भाविक दाखल होणार आहेत. चंद्रभागा वाळवंट परिसर ६५ एकर परिसर दर्शन मंडप प्रदक्षणा मार्ग बस स्थानक रेल्वे स्टेशन आधी ठिकाणी भाविकांची गर्दी होणार आहे या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी यात्रा कालावधीमध्ये भाविकांना गुन्हेगारी लोकांचा त्रास होऊ नये यासाठी ए आय तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. यात्रेवर दहा ड्रोन कॅमेरा द्वारे करडी नजर ठेवण्यात येणार आहे. यांना प्रथमच यात्रेमध्ये भाविकांची संख्या मोजली जाणार आहे. यात्रा कालावधीमध्ये कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पंढरपूर शहरांमध्ये अतिशय चोकच बंदोबस्त ठेवणार असल्याची माहिती श्री अतुल कुलकर्णी यांनी सांगितले

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा २६ वा वर्धापन दिन पुण्यामध्ये जल्लोषात साजरा**

**राष्ट्रवादीच्या नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची लक्षणीय उपस्थिती**

## 'महाराष्ट्राचा विकास' हा एकच अजेंडा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राहील : अजित पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : विजय घनघाव / प्रफुल्ल शेवाळे : महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी पुणे शहरात आज राष्ट्रवादी काँग्रेस चा २६ वर्धापन दिन मोठया दिमागात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. अवघे पुणे शहर राष्ट्रवादी मय झाल्याचे चित्र यावेळी पहायला मिळाले.

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस चे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थितांना संबोधित केलं.

अजितदादा यांनी वर्धापन दिनाच्या सर्वांना मनापासून शुभेच्छा देऊ केल्या. . यावेळी मार्गदर्शन भाषणात अजितदादा म्हणाले की, आज प्रचंड संख्येनं सगळे या ठिकाणी उपस्थित राहिले तसंच राज्यासह संपूर्ण देशात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी-कार्यकर्ते आजचा वर्धापन दिन साजरा करत आहेत, याचं मला फार समाधान आहे. तुमच्यातील उत्साह पाहून मला अधिक काम करण्याची ऊर्जा मिळते.





महाराष्ट्राची अस्मिता आणि देशाच्या प्रगतीची, उज्ज्वल भविष्याची आशा असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं आपली वाटचाल पुढे सुरू केली. पक्षाच्या उभारणीत प्रत्येक जाती धर्माच्या सहकाऱ्यांनी, पदाधिकाऱ्यांनी, कार्यकर्त्यांनी, माझ्या माय-माऊलींनी, भगिनींनी, युवक-युवतींनी असं सर्वांनीच मोलाची साथ दिली. अशा पद्धतीनं प्रगती करत आज आपण पक्षाचा २६ वा वर्धापन दिन साजरा करत आहोत.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारधारेनं चालणारा, स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांसारखं बेरजेचं राजकारण करणारा, सुसंस्कृत महाराष्ट्रामध्ये कशा पद्धतीनं जनतेशी वागलं पाहिजे, त्यांच्याशी बोललं पाहिजे, याचा भान ठेवणारा पक्ष आहे. विरोधी बाकावर बसून नुसत्या घोषणाबाजी करून, आंदोलनं करून, मोर्चे काढून चालत नाही. लोकांना दिशा दाखवणारे, त्यांचे प्रश्न सोडवणारे, बेरजेचं राजकारण करणारे आम्ही लोकप्रतिनिधी आहोत.

राज्याच्या सत्ताकारणात, समाजकारणात कोणत्याही भूमिकेत आपण असताना 'महाराष्ट्राचा विकास' हा एकच अजेंडा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राहील. त्याचप्रमाणे देशपातळीवर देशाचा विकास, शेतकरी-कष्टकरी, सर्वसामान्य जनतेच्या प्रगतीसाठी तळमळीनं काम करत राहणं, हीच आपली सर्वांची प्रमुख भूमिका राहील. आपल्या कामातून राज्याचं भलं झालं पाहिजे, राज्याचा विकास झाला पाहिजे. शेती, उद्योग, व्यापार, सहकार, कला, क्रीडा, साहित्य, संस्कृती अशा सर्वच क्षेत्रात महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर असायला हवा, यासाठी आपण सदैव प्रयत्नशील राहू, अशा प्रकारचे मार्गदर्शन अजितदादा यांनी यावेळी उपस्थितांना केले.

राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी आज पुण्यात बालेवाडी स्टेडियम मध्ये उपस्थित होते.

# पोलीस निरीक्षक सुर्यकांत कोकणे यांची पोलिस कर्मचाऱ्यास गाडुन टाकण्याची धमकी



## चिठ्ठी लिहून ठेवत पोलीस कर्मचारी गायब; पोलीस कर्मचाऱ्यांच्या पत्नीने केले गंभीर आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका पोलीस कर्मचाऱ्याने अचानक काही न सांगता घर सोडून निघून गेल्याने त्याच्या पत्नीने इंदापूर शहर पोलीस ठाण्यात नवरा बेपत्ता झाल्याची खबर नोंदवली आहे.

विष्णू सुभाष केमदारणे (वय ३९ वर्ष राहणार इंदापूर पोलीस स्टेशन शासकीय वसाहत मूळ राहणार कंदर तालुका करमाळा जिल्हा सोलापूर) हा पोलीस कर्मचारी ९ जून २०२५ रोजी रात्री साडेदहा वाजता पासून काही न सांगता बेपत्ता झाला आहे.

आसपास शोध घेऊनही तपास न लागल्याने या पोलीस कर्मचाऱ्यांची पत्नी प्रियंका विष्णू केमदारणे यांनी इंदापूर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे.

दरम्यान इंदापूर पोलीस ठाण्यात हा पोलीस कर्मचारी बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवण्यात आली आहे. मात्र त्याच्या पत्नीने पत्रकारांसमोर येऊन माहिती देताना इंदापूर पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांवर आणि सहकारी कर्मचाऱ्यांवर आरोप केला आहे. या पोलीस ठाण्याच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या त्रासामुळेच आपला नवरा निघून गेल्याची तक्रार या महिलेने केली असून, माझा पती माघारी परतला नाही, तर मी इंदापूर पोलीस ठाण्यासमोर आत्मदहन करेल असा इशारा दिला आहे.

दरम्यान संबंधित पोलीस कर्मचारी याआधी देखील बेपत्ता झाला होता, अशी माहिती त्याच्या पत्नीनेच दिली असून, त्यापूर्वी तो घरगुती वादातून बेपत्ता झाला होता, घरातून निघून गेला होता अशी पुस्ती संबंधित कर्मचाऱ्यांच्या पत्नीने केली. मात्र त्यावेळी आपला पती घरगुती वादातून गेला होता, आता त्याच्या जाण्यामागे नोकरीतील अंतर्गत वाद कारणीभूत असल्याचा ठाम आरोप तिने केला आहे.

या संदर्भात अद्याप पोलिसांच्या वतीने कोणीही स्पष्टीकरण दिलेले नाही, मात्र या निमित्ताने इंदापूर पोलीस ठाण्यात देखील पोलिसांमध्ये अंतर्गत वाद आहेत का याची चर्चा मात्र इंदापूर तालुक्यातील जनतेत रंगत आहे. याबाबत इंदापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत ओपनिंग व कर्मचाऱ्यात झालेले रेकॉर्डिंग सध्याला सोशल मीडियात तुफान वायरल होत आहे. अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरणाची प्रतीक्षा आहे.

## अनुसूचित जाती प्रवर्गातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सरकारी शिष्यवृत्तीचा लाभ घ्यावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या कार्यालयामार्फत अनुसूचित जाती, या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परीक्षा फी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती व विद्या वेतन या योजनांचा लाभ देण्यात येतो. वरील सर्व योजना शासनामार्फत https://mahadbt.maharashtra.gov.in/Login/ या प्रणालीवरून ऑनलाईन राबविण्यात येत आहेत.



त्याअनुषंगाने सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता महाडीबीटी प्रणालीवरील नवीन आणि नुतनीकरणाचे आवेदन अर्ज स्वीकृत, मंजूर करण्यासाठी दिनांक १५ जून २०२५ पासून महाडीबीटी प्रणाली सुरू करण्यात येणार आहे. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यातील कनिष्ठ, वरिष्ठ,व्यावसायिक, बिगर व्यावसायिक, तांत्रिक या सर्व महाविद्यालयांना याद्वारे सुचित करण्यात येते की, अनुसूचित जाती प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांचे भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण फि परीक्षा फि, राजर्षी छत्रपती शाहु महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, विद्या वेतन या योजनांचे नवीन, नुतनीकरणाचे अर्ज विद्यार्थ्यांकडुन तात्काळ भरून घ्यावेत. व सदरचे आवेदन अर्ज मंजूरी करिता या कार्यालयाकडे ऑनलाईन सादर करण्यात यावे. उपरोक्त नमुद योजनेच्या लाभापासून मागासवर्गीय विद्यार्थी वंचित राहणार नाही याची सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी नोंद घ्यावी. असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाने ज्या पद्धतीने इतर मागासवर्ग समाजाला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये २७ टक्के आरक्षण दिले आहे, त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीकरिता सर्व महानगरपालिका, नगर पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीमध्ये सरसकट १३ व ७ टक्के अनुक्रमे आरक्षण द्यावे, अशी शिफारस राज्य शासनाकडे करण्यात येणार आहे, असे महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी सांगितले आहे. मुंबई महानगरपालिकेतील अनुसूचित जातीच्या वॉर्ड संदर्भात माजी मंत्री भाई गिरकर, विविध संघटना, प्रशासकीय अधिकारी यांची महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाकडे बैठक झाली. या बैठकीस विधि व न्याय विभागाच्या सहसचिव श्रीमती अश्विनी सैनी यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## निफाडला वटपौर्णीमा निमित्ताने माणुसकी फांऊडेशनच्या वतीने वडाचे रोपटे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : वटपौर्णिमा च्या निमित्ताने वडाच्या झाडांचे वाटप माणुसकी फाऊंडेशन निफाड हयांचा स्तुत्य उपक्रम आपल्या परंपरा संस्कृती चे जतन करतांना आपण निसर्ग संवर्धन करणे गरजेचे आहे. कारण निसर्ग आणी मानवी जिवनाचे नाते अतुट आहे. वटपौर्णिमा हा सण महिलांसाठी अत्यंत जिव्हाळा तसेच मनातील आपल्या पतीबद्दल चे भावना वडपुजनाच्या माध्यमातून व्यक्त करण्याचा पवित्र दिवस परंतु ज्या वडाच्या झाडाचे ऐतिहासिक काळापासून धार्मिक तसेच वैज्ञानिक पातळी वर अनन्य साधारण महत्व आहे अशा वडाच्या झाडांचे संवर्धन ही महत्वाचे आहे. हिच भावना लक्षात घेऊन निफाड



येथे माणूसकी फाऊंडेशन च्या वतीने सागर निकाळे तसेच मित्रपरिवार हयांच्याकडुन झाडे वाटप करण्यात आली. महिलांना पुजा जरुर करावी त्यासोबत वडाच्या झाडांची लागवड करुन निसर्ग जपण्याचा वारसा समृद्ध करावा त्याचप्रमाणे सामाजिक स्तरावर हा महत्वपूर्ण संदेश जावा हया हेतूने हा उपक्रम आयोजित केला होता. याप्रसंगी मालीनी वाघ.मैना पर्वत, गुंताबाई जाधव, जिजाबाई महाजन. शांताबाई जाधव. हिराबाई जाधव आदी महीला उपस्थितीत होत्या.



## डॉ. सुरेश कोडीतकर, मंदार गोंजारी, सतीश आळेकर आचार्य अत्रे साहित्य, पत्रकारिता, कलाकार पुरस्काराने १३ जून रोजी सन्मानित

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : पुरंदर आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांचा १३ जून रोजी ५६वा स्मृतिदिन आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान पुरंदर यांच्या वतीने सासवड येथे साजरा होणार आहे.

प्रतिष्ठान च्या वतीने साहित्य, कलाकार, पत्रकारिता पुरस्काराने डॉ सुरेश कोडीतकर( साहित्य ), श्री मंदार गोंजारी (पत्रकारिता ) श्री सतीश आळेकर (कलाकार )सन्मानित होणार आहेत. डॉ सतीश देसाई माजी महापौर पुणे महानगरपालिका हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व विजय कोलते कार्यक्रमाचे अध्यक्ष पद भूषवणार आहेत.

## पुणे येथील महात्मा गांधी कुष्ठरोग वसाहत नियमित करण्याबाबतची कार्यवाही तातडीने करण्यात यावी : विधानपरिषद सभापती प्रा.राम शिंदे

**विधानपरिषदेचे सदस्य आमदार योगेश टिळेकर यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्या वरील बैठक**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : समाजातील वंचित आणि दुर्लक्षित घटकांना न्याय देणे हे शासनाचे धोरण असून त्यानुसार अंतुलेनगर, पिसोळी ता.हवेली, जि.पुणे येथील महात्मा गांधी कुष्ठरोग वसाहत नियमित करण्याबाबतची कार्यवाही तातडीने करण्यात यावी. वन आणि महसूल विभाग यांनी योग्य समन्वयाद्वारे कुष्ठरोगग्रस्त नागरिकांना येथे कायमस्वरुपी हक्काची घरे देण्याबाबत उपाययोजना करावी. गेल्या २० वर्षापासून हा विषय प्रलंबित रहावा, ही अत्यंत गंभीर बाब आहे. आता अधिक विलंब न करता आठ दिवसाच्या आत समन्वयाने हा प्रस्ताव सादर केला जावा, असे निर्देश विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी दिले.



विधानपरिषदेचे सदस्य आमदार योगेश टिळेकर यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात १२ मार्च, २०२५ रोजी अंतुलेनगर, पिसोळी येथील कुष्ठरोगग्रस्त नागरिकांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने औचित्याचा मुद्दा उपस्थित करुन या विषयाकडे लक्ष वेधले होते. यासंदर्भात विधान भवन, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस विधानपरिषदेचे सदस्य आमदार योगेश टिळेकर, विधानमंडळाचे सचिव (३) डॉ.विलास आठवले, वन विभागाचे मुख्य वन संरक्षक एन.आर.प्रवीण (पुणे), वन संरक्षक श्री.मोहिते, तहसीलदार किरण सुरोवसे, अवर सचिव (महसूल) संजय जाधव तसेच वसाहत प्रकल्प प्रतिनिधी स्नेहल दगडे, जान्हवी बोरसे उपस्थित होते. सदरहू वसाहत ही वन विभागाच्या जागेवर आहे. ४० टक्के अपंग प्रमाणपत्र असलेल्या व्यक्तींना सरकारी जमीन देण्याचे शासनाचे धोरण आहे. शासनाने सन २००४ मध्ये महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रातील कुष्ठरोगी वसाहती नियमित केल्या आहेत. याच धर्तीवर पिसोळी येथील वसाहत देखील नियमित करुन संबंधितांना न्याय द्यावा, अशी मागणी विधानपरिषदेचे सदस्य आमदार श्री. टिळेकर यांनी केली. त्यानुसार महसूल विभागाने आठ दिवसाच्या आत हा प्रस्ताव तयार करण्याचे आदेश सभापती प्रा. शिंदे यांनी दिले.

**स्वेरीत 'अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन कक्षाचे'थाटात उदघाटन**

**पालकांना मिळणार योग्य व खात्रीशीर मार्गदर्शन**

# स्वेरीच्या मार्गदर्शन कक्षातून प्रवेशासंदर्भात मिळणार अचूक माहिती' : माजी तंत्रशिक्षण संचालक डॉ. एन. बी. पासलकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता प्रथम वर्ष अभियांत्रिकी,थेट द्वितीय वर्ष (पदवी),पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी (एम.टेक ),एम.बी.ए. व एम.सी.ए. या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासंदर्भातील सर्व माहिती एकाच छताखाली उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने स्वेरीज् कॉलेज ऑफ ऑफ इंजिनिअरींग (ऑटोनॉमस) मध्ये अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन कक्षाचे उदघाटन करण्यात आले.




पंढरपुरातील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.एस. बळवंत व माजी तंत्रशिक्षण संचालक डॉ. एन. बी. पासलकर यांच्या शुभहस्ते व हायर एज्युकेशनचे माजी सहसंचालक व सचिवालयातील माजी ओएसडी डॉ. विजय कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत 'अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन कक्षाचे'उदघाटन करण्यात आले. यावेळी माजी तंत्रशिक्षण संचालक डॉ. एन. बी. पासलकर उपस्थित पालक व विद्यार्थ्यांसमोर आपले मनोगत मांडत होते. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ ऑफ इंजिनिअरींग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, माजी अध्यक्ष व विश्वस्त एन.एस. कागदे, माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, विश्वस्त एच.एम.बागल, इतर मान्यवर, पालक व स्वेरीच्या प्रवेश प्रक्रीयेमधील उच्च शिक्षित प्राध्यापक वर्गउपस्थित होते. उदघाटनानंतर प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता डॉ.करण पाटील यांनी आलेल्या पाहुण्यांचे गुलाबपुष्प देवून स्वागत केले. त्यानंतर अधिष्ठाता डॉ.करण पाटील म्हणाले की, 'ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी डॉ. बी.पी. रोंगे सरांनी १९९८ साली अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापना केली. ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांना बारावीनंतर कोणत्या क्षेत्रामध्ये करिअर करावे याबद्धल येथील तज्ञ प्राध्यापकांद्वारे अचूक मार्गदर्शन करण्यासाठी या कक्षाची निर्मिती केली आहे. तसेच पदवी उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांची चांगल्या कंपनीत अथवा प्रशासकीय क्षेत्रात कशी निवड होईल व उत्तम करिअर कसं घडेल या दृष्टीने सातत्याने प्रयत्न होत आहेत. प्रयत्नांना यश मिळाल्यामुळे साहजिकच प्रत्येक वर्षी स्वेरीच्या यशाचा आलेख देखील उंचावत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी व त्यांच्या पालकांना अभियांत्रिकी,एम.बी.ए., एम.सी.ए. व विधी (लॉ) या विद्याशाखांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती देण्यासाठी तसेच शैक्षणिक शुल्क,शासनाच्या विविध स्कॉलरशिप्स, विद्यार्थ्यांसाठी असणारी वसतिगृह सुविधा अशा विविध बाबीसंदर्भात चर्चा व मार्गदर्शन होण्यासाठी या कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. या मार्गदर्शन कक्षात उच्चशिक्षित प्राध्यापक वर्गाची टीम सकाळी ९ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सज्ज असणार आहे. यामुळे एकाच छताखाली सर्व अचूक माहिती मिळणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांची आवड/ क्षमता,पालकांची निवड आणि प्राध्यापकांशी असणारा समन्वय/ संपर्क या बाबी या प्रक्रियेत अत्यंत महत्वाच्या आहेत. स्वेरी संचलित अभियांत्रिकी (पदवी) महाविद्यालयात प्रथम वर्ष,थेट द्वितीय वर्ष व पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यापासून ते प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे,प्रमाणपत्रे, यांची पडताळणी,शैक्षणिक पात्रता,प्रवेश घेताना तसेच महाविद्यालयांची निवड करताना विद्यार्थ्यांनी करिअरचा विचार करून नेमक्या कोण-कोणत्या महत्वाच्या बाबी पहाव्यात व तपासाव्यात,कॅप राउंडस,कॅम्पस प्लेसमेंट, ब्रँचची निवड,मागील वर्षातील विविध विभागांचे कट ऑफ मार्क्स या व इतर संबंधित गोष्टींबाबत विद्यार्थी व पालक यांना योग्य व खात्रीशीर मार्गदर्शन या ठिकाणी मिळणार आहे.'स्वेरीचे सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे म्हणाले की, 'विद्यार्थी व पालकांचा अभ्यास, विचार आणि मानसिकता तसेच डिजिटल टेक्नोलॉजीचा विपरीत परिणाम होऊ नये व वस्तुस्थितीची जाणीव व्हावी. मनाचा गोंधळ उडू नये व करिअरच्या दृष्टीने कक्षातील प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळे एक ठोस निर्णय घेता यावा या हेतूने या कक्षाची निर्मिती केली आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ ऑफ इंजिनिअरींग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली तज्ञ प्राध्यापक हे मार्गदर्शन करत आहेत. हे मार्गदर्शन कक्ष विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना नक्कीच फायदेशीर ठरेल यात शंका नाही. या संदर्भात अधिक माहितीसाठी मोबा. क्र. ९५९५९२११५४ व ९१६८६५५३६५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.